## नि.दि.मु.क्र. १८०/२०१४ मधील निशाणी ८० वरील आदेश

सदरहू अर्ज वादीनी, मयत वादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेल्या अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्ट्यर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जावर प्रतिवादीनी त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, मयत वादी क्र. १ संदिप शिवाजीराव पवार हे दि.३१/०१/२०२१ रोजी मयत झाले. अर्जामधील नमूद कारणांमुळे विहीत कालावधीमध्ये वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. दावा चालविण्याकरीता अबेटमेंटचा आदेश रद्द करून सदरचा अर्ज मंजूर करणे अत्यंत गरजेचे आहे. अर्ज मंजूर न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली. प्रतिवादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्ज र.रू. ५०००/– चे खर्चावर मंजूर करण्यात यावा.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. मयत वादी क्र. १ हे दि. ३१/०१/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज दि. २२/०९/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदरचा अर्ज दाखल करणेस अंदाजे एक वर्षे तीन महिने विलंब झालेला आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदरचा दावा ताकीद व दावा कलम १क मधील अतिक्रमीत बांधकाम स्वतःचे खर्चाने पाडून कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीचा झालेला विलंब जाणीवपूर्वक असल्याचे दिसून येत नाही. सदरची परवानगी न दिल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादीचे तसे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेला विलंब हा प्रतिवादींना योग्य तो खर्च देवून त्याची भरपाई करण्यासारखा आहे. परिणामस्वरूप, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

**– : आ दे श :–**

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ८०) रक्कम रुपये २००/– चा खर्च प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. सदरचा खर्च हा पुढील तारखेपर्यंत देण्याचे आहे.

२) वादी क्र. १ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश येणेप्रमाणे रद्द करण्यात येतो.

Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2022.10.14 17:17:07 +0530

पाटण (प्र.शं. गिरगांवकर )

दि. १४/१०/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.